महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ

# बैठकीचे ईतिवृत्त

## महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पनचक्की, औरंगाबाद.

| | |
|---|---|
| दि. १९ जुन २०१८<br>वेळ सकाळी ११. ०० वाजता | ठिकाणः- इस्लाम जिमखाना, मरीन लाईन , मुंबई |

दि. १९ जून, २०१८ रोजी ११.०० वाजता इस्लाम जिमखाना, मरीन लाईन, मुंबई येथे महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाची बैठक मा. जनाब हुसैन दलवाई साहेब, खासदार, तथा सदस्य यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. त्यात खालील प्रमाणे मा. सदस्य उपस्थित होते. सदरच्या सभेत खालील विषयावर विचार विनिमय करुन निर्णय घेण्यात आले.

१) मा. जनाब हुसैन दलवाई साहेब, सभेचे अध्यक्ष

२) मा. जनाब मौलाना गुलाम वस्तानवी साहेब, सदस्य

३) मा. जनाब मौलाना जहीर अब्बास रिजवी साहेब, सदस्य

४) मा. जनाब आसिफ शौकत कुरेशी साहेब, सदस्य

५) मा. जनाब खालीद बाबु कुरेशी साहेब, सदस्य

६) मा. जनाब इम्तियाज मुश्ताक काजी साहेब, सदस्य

७) मा. जनाब एस. सी. तडवी साहेब सदस्य सचिव तथा

मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद

सभेच्या सुरुवातीस मा. जनाब मौलाना गुलाम मोहम्मद वस्तानवी साहेब सदस्य यांनी कुरआन-ए-पाक मधील सुरह फातीहाची तिलावत केली व सभेच्या कामकाजास सुरुवात करण्यांत आली

**विषय क्रं. १.** **सन्माननिय सदस्यांच्या रजे बाबत**

ठराव क्र. १ जनाब एम.एम.शेख साहेब, कार्याध्यक्ष हे आजारी असल्यामुळे रजेवर आहे. म्हणुन त्यांच्या रजेस सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

**विषयः- क्रं. २.** **मागिल सभा दि. ८ व ९ मे, -२०१८ च्या सभेच्या इतिवृत्त वाचून कायम करणे बाबत.**

ठराव क्र. २.

मागील सभा दि. ८ व ९ मे, २०१८ च्या इतिवृत्तास सभे समोर वाचून दाखविण्यात आले त्यावर सविस्तर चर्चा होवून चर्चेअंती इतिवृत्ता मधील ठराव मध्ये सुधारणा करुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

विषय क्रं. ०३

**सैफी मस्जीद वक्फ, भेंडी बाजार, मुंबई चे बांधकामास नाहरकत प्रमाणपत्रा बाबत.**

सविनय सादर करण्यांत येते की, प्रादेशिक वक्फ अधिकारी मुंबई यांनी पत्र क्र. एसएनटी/१२३/२०१७ दि. २५/७/२०१७ अन्वये अहवाल सादर केले आहे त्यामध्ये सैफी मस्जीद वक्फ, भेंडी बाजार, मुंबई ही संस्था वक्फ मंडळात क्र. MSBW/MUM/३१३/२०१४ अन्वये नोंदणीकृत वक्फ संस्था आहे. सदर मस्जीद जुनी व जिर्ण झालेली असुन १०० वर्षा पुर्वीची आहे मस्जीदच्या भिंती कोसळलेले असल्याने त्याला टेका दिलेला आहे सदर मस्जीद मध्ये सर्व बोहरी समाजाचे लोक हजारोंच्या संख्याने नमाज अदा करतात परंतु मस्जीदच्या जिर्ण अवस्थेमुळे नमाजी लोकांच्या जिवीतास धोका निर्माण झालेला आहे. सदर मस्जीदच्या पुर्व बाजुला महिलांना नमाजसाठी जागा आहे त्याचे पिल्लर व मिनार मध्ये दरार पडलेली आहे सदर मस्जीदच्या तळ मजल्यास लोखंडी चेनल चे सपोर्ट लावण्यात आले आहे तसेच महिलासाठी येणारे मार्ग व पहिल्या मजल्याचे प्रवेश ही सध्या बंद करण्यांत आले असल्याचे नमुद केले आहे.

सदर वक्फ संस्थेस सिटी सर्वे क्रमांक १) ३५७९ क्षेत्र ८१६.९ चौ.मि. २) ३५८० क्षेत्र १८०.६ चौ.मि. ३) ३५८८ क्षेत्र १५४.६८ चो. मि. ४) ३५८९ क्षेत्र १२५.३३ चौ.मि. एकुण क्षेत्र १२७७.५१ चौ.मि. आहे. सदर मस्जीदची दुकाने होती ती संस्थेने काढून त्याचा समावेश मस्जीदचे विस्तार मध्ये करण्यात येणार असल्याचे शपथपत्र दिले आहे सदर मस्जीदचे बांधकाम विश्वस्त व वर्गणी द्वारे होणार आहे. सदर मस्जीद तीन मजली बांधण्यात येणार असुन त्याचे पुर्नविकास बांधकामासाठी प्लॅन व इस्टीमेटची प्रत देऊन या कार्यालयाचे नाहरकत प्रमाणपत्र मिळणेस अर्जदार यांनी विनंती केल्यावरुन प्रादेशिक वक्फ अधिकारी मुंबई यांनी त्यांचे अहवाल सादर केले आहे. तसेच महाराष्ट्र शासन अल्पसंख्यांक विकास विभाग मंत्रालय, मुंबई-३२ यांनी वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ९७ अन्वये सदर प्रकरण बांधकाम नाहरकत प्रमाणपत्र देणे बाबत निर्देश दिलेले आहेत.

दि. ०८ व ०९ मे २०१८ रोजी च्या बैठकीत सैफी मस्जीद वक्फ, भेंडी बाजार, मुंबई च्या विकास आराखडयाला व बांधकामाला शासनाच्या आदेशानुसार मान्यता देण्या पुर्वी दि.१५/०५/२०१८ रोजी सर्व सदस्यांनी स्थळ पाहणी करावी असे ठरले होते. त्यांच्या अहवालानुसार पुढील कार्यवाही करणे बाबत

ठराव क्र. ०३

सैफी मस्जीद वक्फ, भेंडी बाजार, मुंबई च्या बांधकाम व पुर्नविकास कामासाठी दि. ८ व ९ मे, २०१८ रोजीच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे सर्व सन्माननीय सदस्य व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दि. १५/०५/२०१८ व दि. ८/६/२०१८ रोजी सदर संस्थेच्या मस्जीदीची स्थळ पाहणी करुन सदरचे पुर्नविकास बांधकामास मान्यता देणे बाबत अहवाल सादर केलेला आहे.

यावर सविस्तर चर्चा होवून चर्चेअंती सैफी मस्जीद वक्फ, भेंडी बाजार, मुंबई हा संस्था वक्फ मंडळात क्र. MSBW/MUM/३१३/२०१४ अन्वये नोंदणीकृत वक्फ संस्था असून सदर संस्थेच्या संबंधित असलेली वक्फ मालमत्ता सिटीएस क्र. १) ३५७९ क्षेत्र ८१६.९ चौ.मि. २) ३५८० क्षेत्र १८०.६ चौ.मि. ३) ३५८८ क्षेत्र १५४.६८ चो. मि. ४) ३५८९ क्षेत्र १२५.३३ चौ.मि. एकुण क्षेत्र १२७७.५१ चौ.मि. आहे. या मिळकतीत मस्जीदीचे बांधकाम जिर्ण झाल्यामुळे सदरची मस्जीद पडून जिवीत हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही म्हणुन शासनाने ही त्यांच्या वरील वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ९७ अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या अधिकाराचा वापर करुन मस्जीदीचे पुर्नविकास बांधकाम करण्यास निर्देश दिले असल्यामुळे तसेच स्थळ पाहणी अहवालानुसार सैफी मस्जीद वक्फ, भेंडी बाजार, मुंबई च्या वरील प्रमाणे मिळकतीत मस्जीदीचे पुर्नविकास करण्याच्या बांधकामास सर्वानुमते मान्यता देण्यात येऊन व परवानगी पत्रावर मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, यांनी सही करुन निर्गमित करावे असे सर्वानुमते ठरले.

विषय क्रं. ०४

**मकदुम बीबी वक्फ पनवेल जि. रायगड च्या संबंधीत असलेल्या वक्फ मिळकती वरील ना हरकत प्रमाणपत्र रद्द करणे बाबत महाराष्ट्र शासन अल्प संख्यांक विकास विभाग, शासन निर्णय क्रं. वक्फ २०१८/प्र.क्र.९६/का-४ दि. २५/०५/२०१८ अन्वये कार्यवाही करणे बाबत.**

सविनय सादर करण्यांत येते की, अवर सचिव, महाराष्ट्र शासन अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांचे निर्णय क्र. वक्फ.२०१८/प्र.क्र.९६/का-४ दि. २५/५/२०१८ या कार्यालयास प्राप्त झाले आहे. त्यामध्ये "मगदुम बीबी वक्फ, पनवेल जि. रायगड" ज्याची नोंद वक्फ मंडळात नोंदणी क्रमांक MSBW/RGD/१७५/२०१० अन्वये झालेली आहे. सदर वक्फ संस्थेच्या संबंधित मिळकत सर्वे नं. ४५७, ए/१, प्लॉट क्र. २८० व २८०/१ या मिळकतीच्या विकास कामा करीता नाहरकत प्रमाणपत्र मिळणे कामी ट्रस्टकडून दि. १८/२/२०११ व २१/५/२०११ अन्वये अर्ज करण्यांत आले होते तथापी, कार्यालयाची धारीके मध्ये तसेच जावक

नोंदवहीत MSBW/SNT/१७५/२०११/०१५/२०११ दि. २५/७/२०११ या क्रमांकाचे नाहरकत प्रमाणपत्राची प्रत आढळून आलेली नाही.

MSBW/SNT/१७५/२०११/०१५/२०११ दि. २५/७/२०११ या क्रमांकाचे नाहरकत प्रमाणपत्र वक्फ मंडळाकडून निर्गमित झालेले नाही. सदर प्रकरणी वक्फ संस्थेच्या ट्रस्टींनी "मे. ओके इस्टेट डेव्हलपर्स प्रा. लि." नावांच्या विकासका बरोबर सदर मिळकतीचा विकास करार केला होता. कालंतराने सदर "मे. ओके इस्टेट डेव्हल्पर्स प्रा. लि." या विकासकाने त्यांच्या कंपनीचे ७८.३४ टक्के शेअर्स "मे. फोन्टाना कम्मोडिल्स प्रा. लि." या अन्य विकासकाला विकून त्या कंपनीसोबत जॉईंट व्हेन्चर केला असल्याचे शासनास कळाले. या घडोमोडी विचारात घेता MSBW/SNT/१७५/२०११/०१५/२०११ दि. २५/७/२०११ हे नाहरकत प्रमाणपत्र रद्द करण्या बाबत महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाला निर्देश देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. या बाबत शासनाने वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ९७ अन्वये खालील प्रमाणे निर्णय दिलेले आहे.

"मगदुम बीबी वक्फ, पनवेल, जि. रायगड" या नोंदणीकृत वक्फ संस्थेच्या संबंधित मिळकत सर्वे नं. ४५७, ए/१, प्लॉट क्र. २८० व २८०/१ या मिळकतीच्या विकास करण्या संदर्भातील MSBW/SNT /१७५/२०११/०१५/२०११ दि. २५/७/२०११ या क्रमांकाचे नाहरकत प्रमाणपत्र तात्काळ रद्द करण्यात यावे असे वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ९७ अन्वये राज्य शासनास प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळास निर्देश दिलेले आहे. निर्णयास्तव सादर

ठराव क्र. ४ — सदरचा विषयावर चर्चा न झाल्यामुळे पुढील बैठकीत ठेवण्यात येईल.

**विषय क्रं. ०५** — **महाराष्ट्र शासन अल्पसंख्यांक विकास विभाग, शासन निर्णय क्रं. वक्फ २०१८/ प्रक्र १०५/१/का-४ दि. २३/०४/२०१८ ची नोंद घेणे बाबत.**

सविनय सादर करण्यात येते की, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद कार्यालयासाठी विभाग प्रमुख, कार्यालय प्रमुख, तसेच सदर कार्यालयाच्या आस्थापने वरील गट -अ, गट -ब, (राजपत्रित), गट -ब (अराजपत्रित ) गट -क व गट -ड मधील पदावर सरळ सेवा, पदोन्नती व प्रतिनियुक्तीने नियुक्त करण्या संदर्भात पदनिहाय्य नियुक्त प्राधिकारी म्हणून महाराष्ट्र शासन अल्प संख्यांक विकास विभाग, शासन निर्णय क्रं. वक्फ २०१८/ प्रक्र १०५/१/का-४ दि. २३/०४/२०१८ अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, यांना घोषीत केलेले आहे. नोंद घेणेस्तव सादर

ठराव क्र. ५ — सदरचा विषयावर चर्चा न झाल्यामुळे पुढील बैठकीत ठेवण्यात येईल

विषय क्रं. ०६ — **दर्गाह हजरत अमिनूल हक्क मस्जीद व कब्रस्तान, सर्वे नं. ९४ औरंगाबाद मुतवल्ली काढून टाकणे बाबत.**

सविनय सादर करण्यात येते की, दर्गाह मस्जीद अमीनुल हक्क ॲण्ड ग्रेवयाड्र औरंगाबाद हि वक्फ संस्थ असुन याची नोंद वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ३६ नुसार करण्यात आलेली असुन ज्याचा नोंदणी क्रं मरावम/औरंगाबाद/२२४/२०११ असा आहे. या कार्यालयाचे आदेश क्रं मरावम/अतियात-७३/७३७/२०१४ दिनांक ०१/०२/२०१४ अन्वये सदरर संस्थाची सेवा व देखरेखसाठी श्री. सय्यद ईल्हाम इमाम फिरदोसी यांनी नेमणुक करण्यात आलेली आहे.

वक्फ संस्था दर्गाह मस्जीद अमीनुल हक्कम सेट्रल बस स्टेंड औरंगाबाद चा प्रकरण मा. वक्फ न्यायाधिकरण औरंगाबाद येथे अर्ज क्रं १५/२०११ या प्रकरणाचे निर्णय दिनांक १०/१२/२०१२ रोजी अर्जदार सय्यद इलहाम इमाम फिरदोसी गुमाल हेसैन फिरदोसी यांच्या बाजुने झालेला आहे. सदरील संस्था मधुन मस्जीद ची व्यवस्था करीत असल्याचे निदर्शनास आले आहे १. हाजी एकबाल कुरेशी २. सलाऊद्दीन मेनोद्दिन रा. औरंगाबाद हे करीत आहे कारण की आपण स्वय घोषित असल्याने आपणांस सुचित करण्यात यते की सदर मस्जीद चा ताबा मुतवल्ली यांना सदरची नोटीस मिळाल्या पासुन एक माहिन्याच्या आंत देण्यात यावा असे आपल्याला सुचित करण्यात येत आहे दरम्यान मस्जीदच्या सर्व कारभार उत्पन्न व खर्चयाची तफशील इमाम मोजन चे हदियाची तफशील लाईट बील पाणी पटी व इतर सर्व खार्च्याची तफशील अभिलेखसह या कार्यालयास ताबडतोब जमा करावे अशी नोटीस क्रं ३६६९/२०१५ दिनांक ३०/०७/२०१५ रोजी देण्यात आली होती.

तसेच जिल्हा वक्फ अधिकारी औरंगाबाद यांनी दिनांक ०४/१०/२०१७ रोजी पण १. हाजी एकबाल कुरेशी २. सलाऊद्दीन मेनोद्दिन रा. औरंगाबाद यांना ताबा सुपुर्द करावे व प्रक्रीयेला संपुर्ण सहाकार्य कराचे असे कळविले होते. वक्फ संस्था दर्गाह मस्जीद अमिनुलहक्क कब्रसतान सिटीएस क्रं २०७२५ औरंगाबाद चा ताबा घेण्यासाठी जिल्हा वकफ अधिकारी दिनांक ०९/१०/२०१७ रोजी दुपारी ३.०० वाजता सदर संस्थावर सर्व अभिलेखसह उपस्थित होते पण १. हाजी एकबाल २. सलाऊद्दीन मोईनोद्दीन हाजर झाले नाही ज्यामुळे ताबा घेण्यात आला नाही ज्यामळे वरील दोघे इस्म गैर हाजर असल्यामुळे सदरील ठिकाणी पंचा समोर पंचनामा करण्यात आला. सदरील संस्थाचे कमेटीचे सचिव अध्यक्ष यांनी मा. वक्फ

न्यायाधिकरण औरंगाबाद येथे दावा दाखल केले जे प्रलंबीत आहे. मंडळाचे निर्णयास्तव सादर

**ठराव क्र. ६** **सदरचा विषयावर चर्चा न झाल्यामुळे पुढील बैठकीत ठेवण्यात येईल**

**विषय क्रं. ०७** **कब्रस्तान ट्रस्ट, मौजे शेगांव ता. शेगांव जि. बुलढाणा च्या संबंधित मिळकतीचा भुसंपादन मावेजा बाबत**

कब्रस्तान ट्रस्ट, मौजे शेगांव ता. शेगांव जि. बुलढाणा हि संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० च्या तरतुदीनुसार बी-२०४ अन्वये नोंदणीकृत असुन वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ४३ नुसार क्र. MSBW/BLD/१०७/२००९ दि. २०/४/२००९ अन्वये रितसर नोंदणी करण्यात आलेली आहे. सदरील कब्रस्तानच्या संबंधित मिळकत शेगांव विकास आराखडा शेगांव बाळापूर राज्य महामार्ग क्र. ११८ आनंद विसावा ते मुरारका शाळा या रस्त्याचे २४ मिटर लांबीत चौपदरीकरणासाठी संपादीत करण्यांत येत असल्यामुळे सदर जागा संपादीत करण्यांत येऊ नये म्हणुन या कार्यालयाने पत्र क्र. मरावमं/एसएनटी-७२१/६८८३/२०१४ दि. ३/१२/२०१४ व पत्र मरावमं/एसएनटी-१३४/१२५७/२०१८ दि. २३/४/२०१८ अन्वये संबंधितांना सुचना दिलेले आहे.

सदर कब्रस्तान मधील संपादीत क्षेत्र २२८.२५ चौ.मिटस जागाचे प्रस्तावास मंजुरी मिळालेली नसल्याने व भुसंपादनाची कार्यवाही न झाल्यामुळे रस्त्याचे चौपदरीकरणाचे काम अपुर्ण आहे मा. उच्च न्यायालयाचे आदेशान्वये विकास आराखडयांतर्गत कामे विहीत कालावधीत पुर्ण करण्याच्या दृष्टीने सदर जागेच्या प्रस्तावास मंजुरी देवून आदेश निर्गमित करण्याची विनंती विभागीय आयुक्त, अमरावती यांनी केली आहे प्रस्ताव पुढील निर्णय व आदेशास्तव सादर.

**ठराव क्र. ७** **सदरचा विषयावर चर्चा न झाल्यामुळे पुढील बैठकीत ठेवण्यात येईल.**

**विषय क्रं. ०८** **दर्गाह पिर शाह चिश्ती ट्रस्ट, संगमनेर ता. संगमनेर जि. अहमदनगर सर्वे नं. ६९ पैकी क्षेत्र २४९ आर जमीनीचे भुसंपादन बाबत.**

दर्गाह पिर शाह चिश्ती ट्रस्ट, संगमनेर ता. संगमनेर जि. अहमदनगर हि संस्था महाराष्ट्र विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० च्या तरतुदीनुसार बी-८१ अन्वये मानीव नोंदणीकृत संस्था असुन ही कलम ४३ अन्वये क्र. MSBW/ADR/१११/२००८ अन्वये रितसर नोंदणी करण्यांत आलेली आहे. सदर संस्थेच्या संबंधित असलेली वक्फ मिळकत स.न. ६९ पैकी २४९

आर जमीन राष्ट्रीय महामार्ग क्र. ५० साठी संपादीत झालेली असुन त्याच्या मोबदल्याची रक्कम ६,५३,६०,९८२/- चा अवार्ड मंजुर करण्यांत आलेला आहे.

वक्फ अधिनियम १९९५ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्रातील सर्व वक्फ संस्था व त्यांच्या संबंधित असलेली वक्फ मालमत्ता महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या अधिपत्त्याखाली येतात म्हणुन संपादीत जमीनीचा मावेजा रक्कमेचा धनादेश महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे नावाने पाठविणे बाबत या कार्यालयाचे पत्र क्र. मरावमं/एसएनटी-२१०/ /२०१८ दि. २६/०४/२०१८ अन्वये मा. उपविभागीय अधिकारी संगमनेर जि. अहमदनगर यांना सुचना देण्यात आलेली आहे. प्रकरण पुढील निर्णय व आदेशास्तव सादर.

ठराव क्र. ८ **सदरचा विषयावर चर्चा न झाल्यामुळे पुढील बैठकीत ठेवण्यात येईल.**

विषय क्रं. ०९ **दर्गाह सुलतान बीबी साहेबा, दर्गाह महेबुब बीबी साहेब, दर्गाह खैरीयत खान, मस्जीद व कब्रस्तान मौजे हतवन ता. जि. जालना च्या संबंधित मिळकतीचा भुसंपादन मावेजा बाबत.**

दर्गाह सुलतान बीबी साहेबा, दर्गाह महेबुब बीबी साहेब, दर्गाह खैरीयत खान, मस्जीद व कब्रस्तान मौजे हतवन ता. जि. जालना ची नोंद शासन राजपत्र दि. २१/६/१९७३ पार्ट-बीचे अनुक्रमांक १ वर असुन वक्फ संस्थेच्या संबंधित असलेली सेवा इनाम जमीन सर्वे नं. ३,७, ८, ९, १०, ११, १२, १३, १४, १५, १६, १७,१८, १९,२०,२१,२२,,२३,२४,५५,५९,६०,६१,६२,६३,६४,६५,६६, ६७ या जमीनी बुडीत क्षेत्रात गेलेली असुन त्याचा मावेजा रक्कमेचा धनादेश महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे नावाने पाठविणे बाबत या कार्यालयाने पत्र क्र. मरावमं/एसएनटी-१३२/१५१५/२०१७ दि. २४/५/२०१७ अन्वये मुख्य अभियंता जलसंपदा विभाग गोदावरी महामंडळ, जालना रोड औरंगाबाद यांना सुचना दिलेली आहे. परंतु अद्याप भुसपादन जमीनीचा मावेजा रक्कमेचा धनादेश या कार्यालयास प्राप्त झालेला नाही. प्रकरण पुढील निर्णय व आदेशास्तव सादर.

ठराव क्र. ९ **सदरचा विषयावर चर्चा न झाल्यामुळे पुढील बैठकीत ठेवण्यात येईल**

विषय क्रं. १० **पाथरी ता. पाथरी जि. परभणी येथील ईदगाह सर्वे नं. ६७ माळीवाडा, चे इदगाह मैदान विकसीत करणे बाबत.**

ईदगाह, पाथरी ची नोंद महाराष्ट्र शासन राजपत्र दि. ५/९/१९७४ पार्ट-अ च्या अनुक्रमांक १५३ वर असुन मुतवल्लीचे रकान्यात गुलाम दस्तागीर अब्दुल कादरी यांचे नावाची नोंद असून वक्फ संस्थेचे क्षेत्रफळ ३४०X७०० फुट

आहे. सदर ईदगाह मैदानचे विकसीत कामासाठी नाहरकत प्रमाणपत्र देणे बाबत मुख्याधिकारी नगर परिषद, पाथरी यांनी त्यांचे पत्र क्र. एमसीपी/सिव्हील/७६७/२०१८ दि. ५/३/२०१८ विनंती केल्याप्रमाणे जिल्हा वक्फ अधिकारी परभणी यांनी शिफारशीनुसार नगर परिषद प्रभाग क्र. (१) पाथरी अंतर्गत ईदगाह मैदान विकसीत करणे सुरक्षा भिंती व ओटा व इत्यादी कामास या कार्यालयाचे पत्र क्र. मरावमं/एसएनटी-११८/११०३/२०१८ दि. १६/३/२०१८ अन्वये कार्योत्तर मंजुरी देण्यात आलेली आहे. पुढील निर्णय व आदेशास्तव सादर.

**ठराव क्र. १०**

**सदरचा विषयावर चर्चा न झाल्यामुळे पुढील बैठकीत ठेवण्यात येईल**

**विषय क्रं. ११**

**आशुरखाना व तकीया मौजे बोरफळ ता. औसा जि. लातूर च्या संबंधित सर्वे नं. ७० पैकी जमीनीचा भुसंपादन मावेजा मिळणे बाबत.**

सविनय सादर करण्यात येते की, आशुरखाना व तकीया मौजे बोरफळ ता. औसा च्या संबंधित सर्वे नं. ७० पैकी जमीन राष्ट्रीय महामार्ग क्र. ३६१ साठी संपादीत झालेली आहे सदर जमीनीचा भुसंपादन मावेजा महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे नावाने पाठविणे बाबत जिल्हा वक्फ अधिकारी लातूर यांनी त्यांचे पत्र क्र. वक्फ/अतियात-६६६-६६६९/२०१७ दि.११/८/२०१७ व पत्र क्र. वक्फ/एसएनटी/८४२ /२०१८ दि.१४/२/२०१८ अन्वये विनंती केली होती परंतु अद्याप पर्यंत वक्फ मंडळास भुसपादन रक्कमेचा धनादेश प्राप्त झालेला नाही.

आशुरखाना व तकीया मौजे बोरफळ ची नोंदशासन राजपत्र दि. १७/४/१९८० पार्ट-अ च्या अनुक्रमांक ६१ वर नोंदणीकृत वक्फ संस्था आहे. सदरील वक्फ संस्थेस सर्वे नं. ७० एकुण क्षेत्र ०२ एकर ०८ गुंठे ईनाम जमीन बहाल असून त्या पेकी जमीन राष्ट्रीय महामार्ग क्र. ३६१ साठी संपादीत झालेली आहे. वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ९१ नुसार वक्फ मिळकत शासनाच्या सार्वजनिक उपक्रमासाठी/प्रयोजनासाठी अधीग्रहीत करावयाची असल्यास अधीग्रहण करण्यापुर्वी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाची पुर्व परवानगी घेणे अनिवार्य असून भरपाई रक्कम महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे नावाने पाठविणे आवश्यक आहे. सदर रक्कम वक्फ मंडळाचे नावाने पाठविणे बाबत या कार्यालयाने पत्र क्र. मरावमं/एसएनटी-७८/२०१८ दि.१५/२/२०१८ अन्वये सक्षम प्राधिकारी तथा भुसंपादन अधिकारी लातूर यांना पत्र दिले आले असुन पुढील कार्यवाही बाबत निर्णय व आदेशास्तव सादर.

**ठराव क्र. ११**

**सदरचा विषयावर चर्चा न झाल्यामुळे पुढील बैठकीत ठेवण्यात येईल**

विषय क्रं. १२ — **सेठ हाजी रहिमतुल्ला सुलेमान दावुनी मॉस्क ट्रस्ट, मुंबईच्या कॅडस्टल सर्व्हे नं. ११८५ (भायखळा डिव्हीजन) च्या विकास कामासाठी व लिज करून देणे बाबत.**

सविनय सादर करण्यांत येते की, प्रादेशीक वक्फ अधिकारी, कोकण विभाग मुंबई यांचे पत्र क्र. २७/२०१८ दि. २४.०४.२०१८ रोजी सेठ हाजी रहिमतुल्ला सुलेमान दावुनी मॉस्क ट्रस्ट, मुंबई हि संस्था वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ४३ नुसार क्र. MSBW/MUM/३५१/२०१६ अन्वये नोंदणीकृत वक्फ संस्था आहे. सदर वक्फ संस्थेच्या मिळकत क्र. कॅडस्टल सर्व्हे नं. ११८५ (भायखळा डिव्हीजन), ऑगटन सर्व्हे नं. १/३८७० कलेक्टर ऑफ लेंड रिव्हीन्यु अन्डर रेन्ट रोल नं. ८४२६ व स्ट्रीट नं. ५१ मुंबई-०८ हि मिळकत मध्ये तळ मंजला व दोन मंजला इमारत व त्यामध्ये तळ मंजला मध्ये एक दुकान असुन सदर मिळकत हे १०० वर्षापासून उभी आहे. सदर संस्थेच्या ट्रस्टी यांनी जाहिर नोटीस वृतमान पेपर मध्ये प्रसिध्द करून सदर मिळकतीची विकास कामासाठी एम.एस. युरोलाईन इन्फ्रा प्रोजेक्ट एल.एल.पी यांनी सर्वोच्च बोली रक्कम रू. ८५ लाख दि. २२.०६.२०१६ रोजी व्यवस्थापण समिती यांचे कडे दिलेली आहे. सदर मिळकतीच्या सरकारी मूल्यांकन रक्कम रू. ६२,४५,०००/- अशी आहे. अर्जदार यांनी सदर मिळकतीची भाडे करून कायमस्वरूपी पर्यायी परिसर मिळवून आणि वस्तूस्थितीसंबंधी स्थिती जाणून घेण्यामूळे वक्फ संस्थेला लाभ करण्यासाठी सदर मिळकतीवर विकास कामासाठी व लिज करून देणे बाबत प्रादेशीक वक्फ अधिकारी, कोकण विभाग मुंबई यांनी अहवाल सादर केलेले आहे. प्रकरण पुढील निर्णय व आदेशास्तव सादर.

ठराव क्रं. १२ — सदरचा विषयावर चर्चा न झाल्यामुळे पुढील बैठकीत ठेवण्यात येईल

विषय क्रं. १३ — **महाराष्ट्रीय महामार्ग क्र. २११ चौपदरीकरणासाठी भुसंपादन (मौ. तेरखेडा ते पारगांव) मौ. तेरखेडा येथील गट नं. ४८२, ४८३, ४८४, ४८५, ४८६ व ४८७ मधील संपादीत क्षेत्र व त्यामधील ईतर ताबा धारकांना नाहरकत प्रमाणपत्र देणे व मावेजा वाटप करणे बाबत.**

भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे मार्फत राष्ट्रीय राजमार्ग क्र. २११ येडशी (कि.मी.१००.०००) ते औरंगाबाद (कि.मी. २९०.२००) या रस्त्याचे चौपदरीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे. मौजे तेरखेडा ता. वाशी जि. उस्मानाबाद येथील वक्फ मंडळ अंतर्गत असलेले गट क्र. ४८२, ४८३, ४८४, ४८५, ४८६ व ४८७ चौपदरीकरणात संपादीत होत असलेल्या जमीनीची ३(A) अधिसुचना दि.२४/०३/२०१३ रोजी स्थानिक वृत्तपत्रातमध्ये

प्रसिध्द करण्यांत आले होते. सदरील प्रसिध्दीनंतर जिल्हा वक्फ अधिकारी उस्मानाबाद यांनी सक्षम प्राधिकारी तथा उपजिल्हाधिकारी भुसंपादन मध्यम प्रकल्प क्र. २ उस्मानाबाद यांचेकडे भुसंपादनाची रक्कम अन्य कोणालाही न देता सदरमावेजा हा मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ औरंगाबाद यांचे नावे जमा करण्या बाबत आक्षेप अर्ज दि. २२/४/२०१३, २४/२/२०१४ व २०/३/२०१४ रोजी दिले होते. त्यानंतर सक्षम प्राधिकारी तथा उप विभागीय अधिकारी भुसंपादन कळंब यांनी दि. ९/११/२०१६ रोजी मौजे तेरखेडा ता. वाशी येथील गट क्र. ४८२, ४८३, ४८४, ४८५, ४८६ व ४८७ साठी जमीनीचे रुपये १,३१,१८,१८१/- व सदरील जमीनीवरील बांधकामासाठीचे रुपये २,५७,०२,००२/- चा निवाडा जाहिर केला असे एकुण रुपये ३,८८,२०,१८३/- चा निवाडा घोषीत करण्यांत आला. सदरील निवाडा जाहिर केल्यानंतर जिल्हा वक्फ अधिकारी उस्मानाबाद यांनी दि. २५/१/२०१७ च्या पत्राद्वारे सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी भुसंपादन कळंब यांना सदरील जागेवर बांधलेल्या घर मालकां विरुध्द मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, यांचे न्यायालयात अतिक्रमण हटविण्याची केस क्र. ५४/४४१/२०१२ अन्वये न्यायप्रविष्ट असल्यामुळे संपुर्ण मावेजाची रक्कम मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्रराज्य वक्फ मंडळ औरंगाबाद यांचेकडे जमा करणे बाबत विनंती केली. मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ औरंगाबादयांनी त्यांचेपत्र दि. १४/२/२०१७ अन्वये परवानगी विना वक्फ मंडळाच्या जागेवर बांधकाम केलेल्या कब्जेदारास वक्फ मंडळाच्या परवानगी शिवाय मावेजा न देण्या बाबत सक्षम प्राधिकारी तथा उप विभागीय भुसंपादन कळंब यांना कळविले.

त्यांनतर सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी भुसंपादन कळंब यांनी दि. २४/५/२०१७ रोजी मौजे तेरखेडा ता. वाशी येथील गट क्र. ४८२, ४८३, ४८४, ४८५, ४८६ व ४८७ साठी जमीनीचे रुपये १,४१,२५,११०/- व सदरील जमीनीवरील बांधकामासाठीचे रुपये १,८५,८८,४१६/- चा पुरवणी निवाडा जाहिर केला असे एकुण रुपये ३,२७,१३,५२६/- चा निवाडा घोषीत करण्यांत आला. सदरील पुरवणी निवाडा जाहिर केल्यानंतर जिल्हा वक्फ अधिकारी उस्मानाबाद यांनी दि. १७/६/२०१७ च्या पत्राद्वारे सदरील जागेवर बांधलेल्या घर मालकां विरुध्द मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, यांचे न्यायालयात अतिक्रमण हटविण्याची केस क्र. ५४/४४१/२०१२ अन्वये न्यायप्रविष्ट असल्यामुळे संपुर्ण मावेजाची रक्कम मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्रराज्य वक्फ मंडळ औरंगाबाद यांचेकडे जमा करणे बाबत विनंती केली.

त्यानंतर सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी भुसंपादन कळंब यांनी दि. २७/६/२०१७ रोजी मौजे तेरखेडा ता. वाशी येथील काही सुटलेल्या बांधकामासाठीचे रुपये ३०,१८,५९२/- चा अतिरिक्त निवाडा जाहिर केला. सक्षम प्राधिकारी तथाउपविभागीय अधिकारी, भुसंपादन कळंब यांनी दि. २८/७/२०१७ व दि.१२/९/२०१७ अन्वये संपादीत क्षेत्रावरील इतर बाबींचा मावेजा निवाडया प्रमाणे भुधारकास वाटप करण्या बाबत नाहरकत प्रमाणपत्र मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ औरंगाबाद यांचेकडे मागीतले.

मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांनी दि. ११/९/२०१७ अन्वये सक्षम प्राधिकारी तथा उप विभागीय अधिकारी भुसंपादन कळंब यांना सदर ईनाम जमीनीवर बसलेले लोक अतिक्रमण धारक असल्याने व त्यांना वक्फ बोर्डाची कसल्याही प्रकारची मान्यता नसल्याने संपादीत जागेचा मोबदल्ला त्यांना देण्यात येऊ नये. असे कळविले.

सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी भुसंपादन कळंब यांनी दि. ५/१/२०१७ अन्वये संपादीत जमीनीचा ताबा हस्तांतर करण्या बाबत प्रतिनिधीस प्राधिकृत करण्यांत बाबत कळविले. सक्षम प्राधिकारी तथाउपविभागीय अधिकारी कळंब यांनी दि. २९/११/२०१७ अन्वये जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांना दि. २२/११/२०१७ रोजी जायमोक्यावर भेट दिली असता स्थानिक लोकांचा ताबा आहे. त्यांनी फक्त तदंगभूत वस्तुचे पैसे मिळावे अशी विनंती केली आहे. वक्फ बोर्ड दोन्ही (जमीन व Structure) चे पैसे मागत आहेत. परंतु जागेवर ताबा देण्यास सहमती दर्शवित नाहीत. त्यामुळे मुदतठेव सक्षम प्राधिकारी यांचे नांवे करण्या बाबतच्या धनादेशावर Joint Signatory अभावी बँकेने मुदतठेव करण्या बाबत नकार दिल्याचे व त्या बाबत मार्गदर्शन करण्या बाबत विनंती केली. दि.२२/११/२०१७ रोजी मा. जिल्हाधिकारी उस्मानाबाद व प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण औरंगाबाद यांच्या सोबत तेरखेडा येथे संयुक्त भेटीदरम्यान वक्फ बोर्डाच्या जमीनीवरील घरांचे दुकानांचे ताबा धारकांसोबत जायमोक्यावर चर्चा केली असता लोकांनी २० ते ३० वर्षापासून वास्तव्यास असलेली सदरील घरे तोडल्यानंतर पर्यायी घर / दुकाने उपलब्ध नसल्यामुळे त्यांचे सर्व कुटुंब रस्त्यावर येईल त्यामुळे त्यांना बांधकामाचे पैस दिल्याशिवाय ते घरतोडू देणार नाहीत. Physical Possession ला ताबा धारकांचा तिव्र विरोध असुन उपजिवीकेचे तसेच निवा-याचे साधन हिरावणार असल्या कारणाने आंदोलन करुन सरळ आत्मदहन करण्याचा ईशारा प्रत्यक्ष जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांचे देखतच दिला. अशा घडामोडींच्या पार्श्वभूमीवर सक्षम प्राधिकारी तथाउपविभागीय अधिकारी भुंसपादन कळंब

यांनी त्यांचे पत्र दि. २९/११/२०१७ नुसार मांडल्याप्रमाणे मुदतठेव करण्या बाबत भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाचा प्रतिसाद मिळत नसल्या बाबतचा अहवाल मा. जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांना सादर केला मुदत ठेवीच्या धोरणा बाबत स्पष्टता नसल्या कारणाने तसेच फक्त मुदतठेव करुन ही वरील परिच्छेतात उल्लेख केल्या प्रमाणे ताबा धारकांचा तिव्र निषेध व आत्मदहना पर्यंत आंदोलन करण्याची तयारी पाहू जाता, मुदतठेव रक्कम २०१६ तसेच मे २०१७ मध्ये सक्षम प्राधिकारी तथा उप विभागीय अधिकारी भुसंपादन कळंब यांचेकडे जमा करुन सुध्दा प्रत्यक्ष जमीनीचा ताबा आज रोजी पर्यंत अप्राप्त आहे ज्या कारणाने मौजे तेरखेडा गावासाठीचा Underpass (VUP) चे बांधकाम तसेच १ कि.मी. लांबी चौपदरीकरणाचे बांधकाम खोळंबलेले आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ औरंगाबाद यांनी संबंधित ताबा धारकांना फक्त बांधकाम व जमीनीवरील ईतरबाबींचे (जमीनीचे मुल्यांकन वगळून) मावेजा देण्या बाबत सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी भुसंपादन कळंब यांना नाहरकत प्रमाणपत्र देण्याचे करावे जेणेकरुन रखडलेला प्रश्न मार्गी लागेल.

सक्षम प्राधिकारी तथा उप विभागीय अधिकारी भुंसंपादन कळंब यांनी वक्फ मंडळाचे नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर संबंधित ताबा धारकांना त्वरीत बांधकामाचा मावेजा वाटप करुन जमीनीचा प्रत्यक्ष ताबा भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणांस हस्तांतरीत करावा.

**ठराव क्र. १३**

राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प अधिकारी, श्री. अजय गाडेकर यांनी सदर महामार्गाचा सविस्तर अहवाल प्रोजेक्टर द्वारे सभे समोर दाखविले त्यामध्ये वक्फ जमीनीचा मोबदला वक्फ मंडळास प्राधिकरणा कडून अदा करण्यांत आलेला असून तो शासनाकडे जमा आहे. परंतु सदर मिळकतीवरील ज्या गैरअर्जदारांची घरे, इमारते, व त्याचा इमला आहे अशांना राष्ट्रीय महामार्गसाठी संपादीत जमीनीमुळे त्यांनाही त्यांच्या बांधकामाचा मोबदला मिळावा अशी शासनाची धारणा आहे परंतु वक्फ मंडळानी त्यावर संबंधितांची बेकायदेशिर घरे, इमारते, बांधण्यात आली असल्यामुळे आक्षेप घेतलेला आहे म्हणुन सदरचा आक्षेप परत घेतल्यास त्यांना मोबदला अदा करण्यास सोयीस्कर होईल व राष्ट्रीय महामार्गाचे काम सुरळीतपणे पुर्ण करता येईल अशी त्यांनी विनंती केली.

यावर सविस्तर चर्चा होवून चर्चेअंती दर्गाह हजरत सय्यद याकुब, कब्रस्तान, तेरखेडा जि. उस्मानाबाद च्या संबंधित असलेली वरील वक्फ मिळकतीवरील भुसंपादनाचा मोबदलेची रक्कम वक्फ मंडळास अदा करण्यांत यावी व सदर मिळकती वरील ज्या गैरअर्जदाराची बेकादेशिररित्या

इमारते, घरे, दुकाने इत्यादी उभारण्यात आलेली आहे त्यांच्या बाबत सन्माननीय सदस्यांनी सदर ठिकाणी जावून संबंधितांशी विचार विनिमय करुन निर्णय घेण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.

विषय क्रं. १४ **मौजे सवर ता. बाभुळगांव जि. यवतमाळ येथील वक्फ मिळकत गट क्र. ७२ चे भुसंपादत मावेजा बबत.**

मौजे सावर ता. बाभुळगांव जि. यवतमाळ येथील वक्फ मिळक्त गट क्र. ७२ एकुण क्षेत्र १०.७५ हे.आर जमीन असुन त्या पैकी क्षेत्र ३.६० हे.आर जमीन बाणगांव प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्राकरीता संपादीत करण्यासाठी उपकार्यकारी अभियंता मध्यम प्रकल्प विभाग यवतमाळ यांनी पत्र दि. ५/११/२०१५ अन्वये मस्जीद कमेटीला पत्र दिले आहे. सदर जमीन तलावासाठी त्यांच्या ताब्यात देण्याकरीता या कार्यालयाची मंजुरी मिळणेस अर्जदार यांनी विनंती केली आहे. तसेच उपकार्यकारी अभियंता यवतमाळ प्रकल्प बांधकाम विभाग यवतमाळ यांनी त्यांचे पत्र क्र. १८५२/रेखा-३/लखमापुर/भुसं/स.ख/२०१६ दि. २१/४/२०१६ रोजी लखमापुर (संग्राहक) तलावासाठी ईस्लाम मस्जीद सावर च्या मालकीची गट क्र. ७२ पैकी क्षेत्र ३.६० हे. आर शेत जमीन संपादीत करण्यासाठी या कार्यालयाची परवानगी मिळणेस्तव विनंती केली आहे.

ईस्लामी मस्जीद सावर ता. बाभुळगांव जि. यवतमाळ हि संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० च्या तरतुदीनुसार क्र. बी-२७ अन्वये नोंदणी झालेली असून महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळा चे अधिकार क्षेत्रा खाली आहे. वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ९१ नुसार वक्फ मिळकत शासनाच्या सार्वजनिक उपक्रमासाठी अधीग्रहीत करावयाची असल्यास अधीग्रहण करण्यापुर्वी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाची पुर्व परवानगी घेणे अनिवार्य असून मोबदल्याची रक्कम महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे नावाने पाठविणे बाबतची बाब या कार्यालयाचे पत्र क्र. मरावम/एसएनटी-२९०/१९६०/२०१६ दि. २६/५/२०१६ अन्वये संबंधित विभागाचे निदर्शनास आणुन देण्यात आली होती परंतु काही अज्ञात इसमाने सहाय्यक मुख्य कार्यकारी अधिकारी यांची खोटी स्वाक्षरी करुन खोटे पत्र तयार करुन भुसंपादन रक्कम उचलण्याचा प्रयत्न केला होता त्यावर या कार्यालयाने पत्र क्र. मरावमं/एसएनटी-१/२४७/२०१७ दि. ३/१/२०१७ अन्वये उप कार्यकारी अभियंता यवतमाळ प्रकल्प बांधकाम विभाग यवतमाळ यांना पत्र देऊन खोटे पत्रावरुन कोणास ही रक्कम वाटप करु नये व त्यांच्यावर कार्यवाही करुन भुसंपादन रक्कम सरळ महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे नावाने धनादेश पाठविणे बाबत सुचना दिले आहे परंतु अद्याप

भुसंपादन रक्कमेचा धनादेश या कार्यालयास प्राप्त झालेला नाही. प्रकरण पुढील निर्णय व आदेशास्तव सादर.

ठराव क्र. १४ — **सदरचा विषयावर चर्चा न झाल्यामुळे पुढील बैठकीत ठेवण्यात येईल**

विषय क्रं. १५ — **मस्जीद मौजे सातारा ता. जि. औरंगाबाद येथील इनाम जमीन गट नं. ३०४ क्षेत्र २४ हेक्टर ८० आर पैकी १५२२ चौरस मिटर्स व ५६७८ चौरस मिटर्स चा भुसपादन मावेजा मिळणे बाबत.**

महाराष्ट्र राज्याच्या औरंगाबाद जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग क्र. २११ च्या (नवीन राष्ट्रीय महामार्ग क्र. ५२) २९०-२०० कि. मि. ३१०-५०० (औरंगाबाद धुळे सेक्शन) पर्यंतच्या प्रस्तावित मार्गासाठी गावाचे नांव क्र. ७ (सातारा) मधील गट क्र. ३०४ क्षेत्र २४ हेक्टर ८० आर, पैकी १५२२ व ५६७८ चौरस मिटर्स जागा दैनिक लोकमत दि. २/१०/२०१६ व दैनिक दिव्य मराठी मधील दि. १४/२/२०१७ मधील अधिसुचने नुसार संपादीत होत आहे. सदर जमीन मस्जीद, सातारा च्या सेवा सशर्थ खिदमत माश जमीन मस्जीदीचे सेवेसाठी बहाल आहे. ज्याची नोंद महाराष्ट्र शासन राजपत्र दि. १७/५/१९७३ अनुक्रमांक १३८ वर असुन ७/१२ च्या उता-यावर ही हस्तांतरीत न होणारी जमीन अशी नोंद महसूली अभिलेखात आहे. सदर जमीनीत मुतवल्ली इनामदारांनी पदाधिकारी व अधिका-यांशी संगनमत करुन या जमीनीत दि. १४/७/२०११ रोजी च्या नाहरकत अन्वये परवानगी दिलेली आहे परंतु "मा. महाराष्ट्र वक्फ न्यायाधिकरण, औरंगाबाद यांचे कडील अर्ज क्रमांक ५३/२०१३ मध्ये मा. न्यायालयानी दि. २९/६/२०१३ रोजी प्रकरणांत आहे तशीच परिस्थिती ठेवण्याचे निर्देश दिलेले आहे." प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. तसेच महाराष्ट्र शासानानी तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ यांनी दिलेले सर्व आदेशा संबंधी श्री. के.बी.भोगे (भा.प्र.से) यांची एक सदस्य चौकशी समितीची नियुक्ती केली होती चौकशी अहवालनुसार महाराष्ट्र शासनानी श्री. एन.डी.पठाण, तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ यांनी या बाबतचे सर्व दिलेले आदेश रद्द करण्यांत यावे व या बाबत तातडीने योग्य ती कायदेशिर कार्यवाही करुन सदर जमीन परत ताब्यात घेण्यासाठी यौग्य पावले उचलण्यात यावी असे शासनाचे आदेश आहे. प्रकरणांत पिठासीन अधिकारी तथा जिल्हा न्यायधिश, मा. महाराष्ट्र वक्फ न्यायाधिकरण औरंगाबाद यांनी स्थगीती आदेश दिलेले आहे.

वरील प्रकरणी मस्जीद सातारा ता. जि. औरंगाबाद च्या संबंधित असलेली सेवा सशर्थ खिदमत माश इनाम जमीन गट क्र. ३०४ मधील अधिसुचना नुसार संपादित जमीनीचा मोबदला महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ,

औरंगाबाद यांचे नावाने आजच्या बाजार मुल्यांकन प्रमाणे रक्कम अदा करण्याची विनंती या कार्यालयाचे पत्र क्र. मरावमं/एसएनटी-८०/११४६/२०१७ दि. ११/४/२०१७ व दि. १५/१२/२०१७ अन्वये सक्षम प्राधिकारी (भुसंपादन) तथा उपविभागीय अधिकारी औरंगाबाद यांना करण्यांत आलेली आहे. परंतु अवार्डची प्रत व धनादेश अद्याप या कार्यालयास प्राप्त झालेले नाही. प्रकरण पुढील निर्णय व आदेशास्तव सादर.

ठराव क्र. १५ — **सदरचा विषयावर चर्चा न झाल्यामुळे पुढील बैठकीत ठेवण्यात येईल**

विषय क्रं. १६ — **चिराग अली कब्रस्तान ट्रस्ट सोलापुर च्या संबंधित सि.स.न. ९९ व ९६९३ मिळकतीचे विकास कामासाठी तत्कालीन मु.का.अ यांनी दिलेले नाहरकत प्रमाणपत्र रद्द करणे बाबत**

१) ॲड. महिबुब बिलाल कोथिंबिरे, सेक्रेटरी चिराग अली कब्रस्तान ट्रस्ट, सोलापुर यांनी दि. २/१२/२०१७ रोजी अर्ज देऊन विनंती केला आहे की, चिराग अली कब्रस्तान ट्रस्ट सोलापुर हे वक्फ मंडळात क्र. MSBW/SLR/५३/२००९ अन्वये नोंदणीकृत असुन सोलापुर येथील टी.पी. १ सि.स.न. ९६९३ व टी.पी. २ सि. स.न. ९९ अशा दोन मिळकतीवर महाराष्ट्र शासन अर्बन डेव्हलपमेंट डिपार्टमेंट तर्फे ५ मार्च २००९ रोजी राजपत्र प्रसिध्द करुन सि.स.न. ९६९३ संदर्भात विकास आराखडा मंजुर करुन सि.स.न. ९६९३ एकुण क्षेत्र १६९६४०.१० चौ.मि. पैकी कब्रस्तान ६७५४४ चौ.मि. टेक्निकल कॉलेज २०२०० चौ.मि., कम्युनिटी हॉल व चॅरिटेबल हॉस्पिटल १०१०० चौ.मि., गर्ल्स स्कूल व हॉस्टेल १०१०० चौ.मि., गार्डन व आपेन स्पेस ११००० चौ.मि., हाऊसींग स्किम २०२०० चौ.मि., बाईज स्कूल, हॉस्टेल व जिमखाना १५४०० चौ.मि. एक्स्ट्रा ओपन स्पेस ५००० चौ.मि. तर सि.सन.९९ एकुण क्षेत्र १३९०० चौ.मि. ही संपुर्ण जागा हाऊसिंग स्किमसाठी आरक्षित केली होती.

महाराष्ट्र शासनाच्या विकास आराखडयास अनुसरुन चिराग अली कब्रस्तान ट्रस्टने वक्फ बोर्डाकडून दि. १८/७/२००९ व दि. १७/१२/२००९ रोजी अर्ज देऊन महाराष्ट्र शासनाच्या मंजुर आराखडयाप्रमाणे नाहरकत प्रमाणपत्र मागीतले होते त्यावर सुनावणी होवून दि. २/१०/२०१० रोजी वक्फ मंडळाने नाहरकत प्रमाणपत्र दिले व त्यानंतर दुरुस्ती नाहरकत प्रमाणपत्रं दि. २४/०४/२०१२ रोजी दिले होते त्यानुसार चिराग अली कब्रस्तान ट्रस्टने टी.पी. २ सि.स.न. ९९ वर चिराग रेसीडेन्सी नावाने सदनिका बांधून त्यातील काही फ्लॅट व दुकानाची विक्री केलेली आहे व फ्लॅट अद्याप विक्री झाले नसल्याचे अर्जात नमुद केले आहे.

वरील प्रकरणी शासन निर्णय दि. १३/४/२०१६ प्रमाणे वक्फ मिळकती वरील ट्रस्टींचे नाव कमी करुन त्यावर वक्फ प्रतिबंधीत सत्ता प्रकार अशी नोंद घेण्यासाठी गैरअर्जदारांनी नगर भुमापन अधिकारी सोलापूर यांच्याकडे अर्ज दिला होता आणि वक्फ बोर्डात श्री. शेख खलील शेख हैदर मनाटकर रा. नांदेड यांनी दि. २८/९/२०१७ रोजी दिलेल्या अर्जावर या कार्यालयातर्फे चुकीचे अभिप्राय पाठविण्यात आले असल्याचे अर्जदार यांनी नमुद केले आहे. सदर अभिप्रायामुळे मिळकत विकसीत करण्याचे काम थांबले आहे आणि विनंती केली आहे की, नगर भुमापन अधिकारी सोलापुर यांना पत्र देऊन फक्त कब्रस्तानसाठी आरक्षित असलेल्या ६७५४४ चौ.मि. जागेवर दि. १३/४/२०१६ च्या शासन निर्णया प्रमाणे वक्फ प्रतिबंधित सत्ता प्रकार शेरा मारावा व इतर मिळकती संबंधी टी.पी. २ सि.स.न. ९९ मिळकती वर शासन निर्णयाची अमलबजावणी करण्यांत येऊ नये म्हणुन स्पष्ट अभिप्राय देण्याची विनंती अर्जदार यांनी केली आहे.

**२)** सदर प्रकरणांत श्री. आय. एस. सय्यद पोलीस निरिक्षक (गुन्हे) सदर बाजार सोलापुर शहर यांचे पत्र क्र. १२७३३/२०१७ दि. २८/११/२०१७ या कार्यालयास दि. १६/१२/२०१७ रोजी प्राप्त झाले आहे. त्यानुसार चिरागअली कब्रस्तान ट्रस्ट ची मालमत्ता विक्री करणे बाबत महाराष्ट्र स्टेट वक्फ बोर्ड यांनी कोणतीही परवानगी दिलेली नाही परंतु वक्फ बोर्डाने दि. २/१/२०१० रोजी दिलेल्या नाहरकत प्रमाणपत्रातील क्र. १४,१५, व १६ मध्ये चिराग अली कब्रस्तान ट्रस्ट चे ट्रस्टींनी बदल करुन दि. २/८१/२०१० रोजीचे वक्फ बोर्डाचे बनावट बोगस प्रमाणपत्र तयार करुन व त्यावर बनावट सही शिक्का करुन ट्रस्टच्या जागेत बांधकाम करुन फ्लॅट व शॉप विक्री करतांना खरेदी खतांना बनावट नाहरकत प्रमाणपत्र पुरावा जोडून फसवणुक करुन ट्रस्टचे मालमत्तेचा व पैशाचा अपहार केले बाबतचा अर्ज श्री. कुदुस याकुब कामले यांनी पोलीस निरिक्षक यांच्याकडे दिलेला आहे.

वरील प्रकरणाची चौकशी या कार्यालयाचे अख्त्यारातील सक्षम अधिकारी यांची नियूक्ती करुन रितसर कागदपत्रांची पडताळणी करुन कायदेशिर कार्यवाही करीता अहवाल त्यांचे पोलीस स्टेशनला पाठविण्याची विनंती केली आहे.

**३)** सोलापुर येथील चिराग अली कब्रस्तान ट्रस्टची वक्फ मिळकतीचे खरेदी विक्री बंद करुन संबंधिता विरुध्द दंडात्मक स्वरुपाचे गुन्हे दाखल करुन सदर वक्फ मिळकतीचा ताबा घेणे तसेच श्री. एन. डी. पठाण यांचे नियमबाहय आदेश विषय क्र. ४ रद्द करणे बाबत श्री. याकुब कांबले रा. सोलापुर यांच्या दि. ०६/०६/२०१७ रोजी च्या अर्जावर मा. श्री. बाबाजानी दुर्राणी साहेब, सदस्य महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, यांनी स्वाक्षरी करुन प्रकरण बोर्डाची

मिटींग मध्ये ठेवण्याची तजविज केलेली आहे. वरील प्रकरण निर्णय व आदेशास्तव सादर.

ठराव क्र. १६

सदरचा विषयावर चर्चा न झाल्यामुळे पुढील बैठकीत ठेवण्यात येईल

विषय क्रं. १७

**मरकजी सुन्नी जामा मस्जीद मोहल्ला बेलदार जमात, धरणगाव जि. जळगांव च्या संबंधित व्यापारी संकुल मधील एकुण ६६ दुकाने भाडेपट्टयाने देण्यासाठी परवानगी मिळणे बाबत.**

जनाब शेख रियाजोद्दिन शेख लाडजी व जनाब सैफोद्दिन शेख हुस्नोद्दिन अध्यक्ष/सचिव, मरकजी सुन्नी जामा मस्जीद, मोहल्ला बेलदार जमात धरणगांव जि. जळगांव यांनी दि. २२/८/२०१७ रोजी अर्ज देऊन विनंती केली आहे की, सदर वक्फ संस्था वक्फ मंडळात क्र.MSBW/६८/२००८ अन्वये नोंदणीकृत असुन वक्फ मालमत्ता क्र. १४९९ हे गावाचे मध्यवर्ती ठिकाणी असुन त्यावर बेकायदेशिर अतिक्रमण होत असल्याने वक्फ संस्थेच्या उत्पन्नासाठी बेलदार समाजातील गोरगरीबांना पत्र्याचे शेड मध्ये गाळे बांधणेसाठी नाहरकत प्रमाणपत्राची मागणी केल्यावरुन या कार्यालयाने आदेश क्र. मरावमं/एसएनटी-३९२/४१४१/२०१४ दि. १४/७/२०१७ अन्वये परवानगी दिलेली आहे सदरची परवानगी फक्त पत्र्याचे शेड बांधण्या करीता देण्यात आली.होती परंतु विश्वस्तांनी दुकानांची बुकींग करुन पक्के आर सी.सी. मध्ये व्यापारी संकुल बांधले आहे व त्यामधील ६६ दुकाने ३० वर्षासाठी भाडेपट्टयाने देण्याची परवानगी मिळणे व व्यापारी संकुल व समाज हॉल बांधण्याची परवानगी मिळणेस विनंती केली आहे.

प्रादेशिक वक्फ अधिकारी नाशिक यांनी त्यांचे अहवाल पत्र क्र. वक्फ/एसएनटी-१३/२५२/२०१७ दि. २१/९/२०१७ अन्वये सादर केले आहे त्यानुसार मरकजी सुन्ना जामा मस्जीद मोहल्ला बेलदार जमात, धरणगांव जि. जळगांव ही संस्था वक्फ मंडळात नोंदणीकृत असुन वक्फ संस्थेच्या संबंधित मालमत्ता क्र. १४९९ मध्ये एकुण ५३ गाळे (दुकाने) बांधण्यात आले आहे व त्याच प्रमाणे गाळयामागे २२ रुम बांधण्यात येणार आहे. वक्फ संस्थेच्या विश्वस्तांनी संबंधित गाळे धारकाकडून डिपॉझिट रक्कम घेवून पावती दिलेली असुन वक्फ संस्थेच्याउत्पन्न वाढविण्यासाठी व्यापारी संकुल व सामाजिक हॉल बांधने व दुकाने भाडेवर देण्याकरीता विश्वस्तांना परवानगी देणे बाबत विचार करण्याची शिफारश प्रादेशिक वक्फ अधिकारी नाशिक यांनी केली आहे.

वरील प्रकरणांत वक्फ संस्थेचे अध्यक्ष विश्वस्तांनी मुस्लीम समाजाच्या गोरगरीबांना घरे बांधुन देणे बाबत ठराव करुन वक्फ कार्यालयाची पत्र्याचे शेड मध्ये गाळे बांधण्याची परवानगी घेवून आर.सी.सी.

चे पक्के बांधद.ाम करुन बेलदार समाजातील गरीब लोकांचे हित न पाहता सदर ठिकाणी व्यापारी संकुलाचे ५६ गाळे बांधुन इतर समाजातील लोकांना परस्पर १० ते १२ लाख मध्ये एक गाळा देऊन पैशाची उलाढाल करुन बेकायदेशिर कृत्य केले आहे त्यामुळे प्रादेशिक वक्फ अधिकारी नाशिक यांनी दिलेले अहवाल नामंजुर करुन सदर कमेटी बरखास्त करणे बेलदार समाजातील गोर गरीब लोकांना गाळे भाडेवर देणे, आणि वक्फ संस्थेच्या विश्वस्ता अध्यक्ष यांच्या विरुध्द कायदेशिर कार्यवाही करणे बाबत १) श्री. शमशेरखान जान खॉ पठाण रा. जळगांव २) शफकत अली रियासत अली शेख रा. धरणगांव ३) फिरोज नवाब पटेल रा. धरणगाव ४) शेख फरीदोद्दिन शेख रईसोद्दिन व इतर ५) आसिफ खान दलशेर खान व इतर यांनी हरकत दाखल केलेली आहे. तसेच व्यपारी संकुलातील दुकाने हस्तांतर व भाडेपट्टे करु नये म्हणुन शेख फरीदोद्दिन रईसोद्दिन यांनी मा. महाराष्ट्र वक्फ न्यायाधिकरण औरंगाबाद येथे दावा वक्फ सुट क्र. १७३/२०१७ दाखल केलेले आहे जे न्यायप्रविष्ठ आहे. प्रकरण निर्णय व आदेशास्तवसादर.

ठराव क्र. १७

सदरचा विषयावर चर्चा न झाल्यामुळे पुढील बैठकीत ठेवण्यात येईल

**विषय क्रं. १८**

**मस्जीद तळेसमन ता. गंगापुर जि. औरंगाबाद ची इनाम जमीन गट क्र. ५६ व ५८ ची मिळकत राष्ट्रीय महामार्ग क्र. २११ (५२) प्रस्तावित (औरंगाबाद ते धुळे सेक्शन) साठी संपादीत जमीनीचा मोबदल्ला मिळणे बाबत.**

मस्जीद तळेसमन ता. गंगापुर जि. औरंगाबाद या वक्फ संस्थेच्या संबंधि इनाम जमीन मौजे तळेसमत ता. गंगापुर येथील गट क्र. ५६ क्षेत्र २ हेक्टर ७२ आर व गट क्र. ५८ क्षेत्र ३ हेक्टर ४४ आर जमीन राष्ट्रीय राजमार्ग क्र. २११ चे भाग नवीन राष्ट्रीय महामार्ग क्र. ५२ (औरंगाबाद-धुळे सेक्शन) पर्यंत भुखंडाचा वळण रस्ता रुंदीकरणसाठी संपादीत होत असल्याची अधिसुचना दैनिक लोकमत मध्ये दि. ३/११/२०१४ (अधिसुचना दि. १७/९/२०१४) प्रसिध्द झाली होती. सदरील इनाम जमीनीची नोंद महाराष्ट्र शासन राजपत्र दि. १/११/१९७३ च्या अनुक्रमांक ६५ वर असुन महसुली अभिलेख ७/१२ मध्ये आहे. सदरील जमीन राष्ट्रीय महामार्गसाठी संपादीत करु नये म्हणुन मा. उपविभागीय अधिकारी तथा समक्ष प्राधिकारी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग क्र. २११ औरंगाबाद यांच्याकडे या कार्यालयाचे पत्र क्र. मरावमं/एसएनटी-३५१/२६१२/२०१७ दि. २७/१०/२०१७ अन्वये अक्षेप/हकरत दाखल करण्यांत आले व इनाम जमीन गट क्र. ५६ व ५८ पैकी संपादीत क्षेत्राची भरपाई रक्कम महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे नाहरकत प्रमाणपत्रा शिवाय इतर कोणालाही वाटप करु नये भुसंपादनाचा मोबदल्ला

रक्कमेचा धनादेश महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या नावाने पाठविणे बाबत कळविण्यांत आले आहे. परंतु अद्याप भुसंपादन रक्कम वक्फ मंडळास प्राप्त झालेली नाही.

प्रकरणांत जिल्हा वक्फ अधिकारी औरंगाबाद यांनी त्यांचे पत्र क्र. ३६४/२०१७ दि. १८/११/२०१७ अन्वये अहवाल सादर करुन इनाम जमीनीचे भुसंपादन मोबदल्ल्याची रक्कम मिळविण्यासाठी वक्फ मंडळाचे पॅनल वरील ॲडवहोकेटची नियुक्ती करण्याची विनंती केली आहे. प्रकरण निर्णय व आदेशास्तव सादर.

ठराव क्र. १८ **सदरचा विषयावर चर्चा न झाल्यामुळे पुढील बैठकीत ठेवण्यात येईल**

विषय क्रं. १९ **महाराष्ट्र राज्याच्या औरंगाबाद जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग क्र. २११ च्या (नवीन राष्ट्रीय महामार्ग क्र. ५२) २९०-२०० कि. मि. ३१०-५०० (औरंगाबाद धुळे सेक्शन) पर्यंतच्या प्रस्तावित मार्गासाठी संपादित (गंधेली) मधील गट क्र. ३०२ एकुण क्षेत्र पैकी ११७०० चौरस मिटर्स जागेचा मोबदला रक्कमे बाबत.**

मौजे गंधेली ता. जि. औरंगाबाद येथील वक्फ मिळकत सर्वे नं. ३०२ मधील एकुण क्षेत्रा पैकी ११७०० चौ. मिटर्स जागा राष्ट्रीय महामार्ग क्र. २११ साठी संपादित झालेली असुन त्याचा निवाडा रक्कम २,८६,२८,९८३/- मंजुर झालेली आहे या बाबत मस्जीद कमीटीला दि. १६/१/२०१८ रोजी नोटीस मिळालेली आहे.

सर्वे नं. ३०२ इनाम जमीन असुन मस्जीद, गंधेली ता. जि. औरंगाबाद च्या संबंधित आहे व त्याची नोंद महाराष्ट्र शासन राजपत्र दि. १७/५/१९७३ पार्ट-सी अनुक्रमांक १०६ वर असुन वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ३६ नुसार क्र. MSBW/ABD/८५४/२०१६ दि. १७/१२/२०१६ अन्वये नोंदणीकृत वक्फ संस्था आहे. सदरील वक्फ संस्थेस सर्वे नं. १३९ (गट क्र. ३०२) एकुण क्षेत्र १३ एकर सेवा इनाम जमीन आहे.

सदरची वक्फ मालमत्ता वक्फ संस्थेच्या सेवेसाठी बहाल आहे त्याचे संपादनाचा मोबदला वक्फ मंडळाकडे जमा होणे आवश्यक असल्याने मोबदल्याची एकुण रक्कम २,८६,२८,९८३/- चा धनादेश महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद या नावाने देणे तसेच सदर मोबदल्ला रक्कम महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे नारहकत प्रमाणपत्रा शिवय इतर कोणत्याही व्यक्तीस किंवा संस्थेस मोबदल्ला रक्कम देण्यात येऊ नये म्हणुन सक्षम प्राधिकारी (भुसंपादन) तथा उपविभागीय अधाकारी, औरंगाबाद यांना पत्र क्र.मरावमं/एसएनटी-२४/३१५/२०१८ दि. २२/१/२०१८ अन्वये कळविण्यांत

आले. सदर भुसंपादन रक्कम वक्फ मंडळा अद्याप प्राप्त झालेली नाही. प्रकरण निर्णय व आदेशास्तव सादर.

ठराव क्र. १९

**सदरचा विषयावर चर्चा न झाल्यामुळे पुढील बैठकीत ठेवण्यात येईल**

**विषय क्रं. २०**

**दर्गाह हजरत पीर सय्यद बद्रोद्दिन साहेब, कवठेमहाकाळ जि. सांगली च्या संबंधित मिळकतीचे बेकायदेशिर भुसंपादन थांबविणे बाबत**

वक्फ संस्था दर्गाह हजरत पीर सय्यद बद्रोद्दिन साहेब, कवठेमहाकाळ जि. सांगली च्या संबंधित मिळकत मुख्याधिकारी नगरपंचायत गवठेमहाकाळ जि. सांगली हे वक्फ मंडळाची व वक्फ संस्थेची कोणतीही परवानगी न घेता संपादीत करुन जमीन ताब्यात घेण्याची कार्यवाही करीत असल्याची तक्रार जनाब रफिक महेबुब शिरोळकर (ईनामदार) व इतर रा. कवठेमहाकाळ जि. सांगली यांनी दि. २३/१/२०१८ रोजी केली होती.

दर्गाह हजरत पीर सय्यद बद्रोद्दिन साहेब मौजे कवठेमहाकाळ ता. कवठेमहाकाळ जि. सांगली ही संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० च्या तरतुदीनुसार बी-१४० अन्वये नोंदणीकृत असुन वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ४३ नुसार क्र. MSBW/SGL/२१०/२०१६ अन्वये नोंदणीकृत वक्फ संस्था आहे. सदरील वक्फ संस्थेस अनुसुचि-१ नुसार मौजे कवठेमहाकाळ येथे गट क्र. ५३२, ५३३, ५३४, ५३५, ५३६, ५४५, ५४६, ५४७, ५४८, ५४९, ५५०, ५५१ हे वक्फ मिळकती असुन सर्वे नंबरचे वाडी विभाजनानंतर गट पडलेले आहे व सध्याचे गट नंबर १४४७ व इतर चा दाखला गांव कामगार तलाठी यांनी दिलेला आहे. तसेच वक्फ मालमत्ता सार्वजनिक उपक्रमासाठी संपादित करण्यासाठी वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ९१ नुसार कोणतीही सुचना वक्फ मंडळास देण्यात आलेली नाही. अर्जदार यांच्या विनंतीवरुन वक्फ मिळकतीचे संरक्षणासाठी सदर जमीन शासनाच्या कोणत्याही प्रयोजनासाठी संपादीत करु नये अथवा जबरदस्तीने जमीन मोजणी व ताबा घेण्याची तसेच भुसंपादन मोबदल्ला वाटप करण्याची कार्यवाही करु नये म्हणुन मुख्याधिकारी नगरपंचायत, कवठेमहाकाळ तसेच उप अधिक्षक भुमी अभिलेख,

कवठेमहाकाळ व इतर यांना या कार्यालयाचे पत्र क्र. मरावमं/एसएनटी-३८/४३१/२०१८ दि. २५/१/२०१८ अन्व्ये सुचना देण्यात आली होती त्यानुषंगाने मुख्याधिकारी नगरपंचायत कवठेमहाकाळ यांनी मोजणीच्या कार्यवाही स्थगीत केले आहे. प्रकरण पुढील आदेशास्तव सादर.

**ठराव क्र. २०** **सदरचा विषयावर चर्चा न झाल्यामुळे पुढील बैठकीत ठेवण्यात येईल**

**विषय क्रं. २१** **जामा मस्जीद वक्फ जमातुल मुस्लेमीन म्हसाळा जि. रायगड च्या संबंधित असलेल्या वक्फ मिळकतीत शाळा बांधकामासाठी बिनशेती करुन घेण्यास मान्यता मिळणे बाबत.**

जामा मस्जीद वक्फ जमातुल मुस्लेमीन म्हसाळा जि. रायगड ही संस्था महाराष्ट्र विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० च्या तरतुदीनुसार बी-२४ अन्वये नोंदणीकृत संस्था आहे.

दि. १/१/१९९६ पासुन वक्फ अधिनियम १९९५ संपुर्ण महाराष्ट्रात लागु करण्यात आलेला असुन कलम ४३ अन्वये मानीव नोंदणीकृत संस्था असुन MSBW/RGD/१५०/२००९ अन्वये रितसर नोंदणी करण्यांत आलेली आहे. सदर संस्थेची मा. उपविभागीय अधिकारी श्रीवर्धन जि. रायगड यांच्याकडे संस्थेच्या संबंधित असलेली वक्फ मिळकत सर्वे नं. ६७/१२ क्षेत्र १-५४-० आकार ०-४७ या जमीनीत मुलीची शाळेचे बांधकाम करण्यांसाठी बिन शेती परवानगी देण्याची विनंती केली आहे. मा. सदस्य यांनी सदर संस्थेचे वरील प्रस्तावास मान्यता बाबत विनंती केली आहे मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्र. २१** **सदरचा विषयावर चर्चा न झाल्यामुळे पुढील बैठकीत ठेवण्यात येईल**

**विषय क्र. २२** **नाखुदा मोहम्मद अली रोगे व नाखुदा मोहम्मद हुसैन रोगे ट्रस्ट च्या सबंधित असलेली वक्फ मिळकत भाडयाने देणे बाबत**

सविनय सादर करण्यांत येते की, स्व. नाखुदा मोहम्मद अली रोगे व स्व. नाखुदा मोहम्मद हुसैन रोगे चॅरिटेबल ट्रस्ट, WB-२९४ अन्वये नोंदणीकृत असुन सदर संस्थेच्या व्यवस्थापकीय विश्वस्तांनी दि. ३/५/२०१८ रोजी अर्ज

देऊन सदर संस्थेच्या संबंधित असलेली वक्फ मिळकत सी.एस.न.१ /२१९३ (५) प्लॉट नं. २८५ बाबासाहेब जयकर मार्ग, बैरामजी अताश बहराम रुपावाडी, च्या समोर ठाकूरड वार्ड रोड, मुंबई मिळकती क्षेत्र २९२.२१ चौ.मि. मे. इंडियन ऑईल कॉर्पोरेशनना भाडेतत्वार देणे साठी परवनगी देणे बाबत विनंती अर्ज दिला आहे. निर्णयग्स्त सदर.

ठराव क्र. २२

यावर सविस्तर चर्चा होवून चर्चेअंती प्रादेशिक वक्फ अधिकारी, कोकण विभाग मुंबई यांच्याकडून सविस्तर अहवाल मागवून सदरचा विषय पुढील बैठकीत ठेवण्यात यावा. असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. २३** **मुस्लीम जमात जुम्मा मस्जीद, कब्रस्तान देहु रोड, पुणे या संस्थेस वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ६५ अन्वये सरळ वक्फ मंडळाच्या अधिपत्त्याखाली घेणे बाबत.**

सविनय सादर करण्यांत येते की, मुस्लीम जमात जुम्मा मस्जीद, कब्रस्तान देहु रोड, पुणे हि संस्था महाराष्ट्र विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० च्या तरतुदीनुसार बी-३७६ अन्वये नोंदणीकृत संस्था आहे. दि. १/१/१९९६ पासून वक्फ अधिनियम १९९५ संपुर्ण महाराष्ट्रात लागु करण्यांत आलेला असुन सदर संस्था कलम ४३ अन्वये मानीव नोंदणीकृत संस्था असुन ही MSBW/PUN/७३/२००८ अन्वये रितसर नोंदणी करण्यांत आलेली आहे. सदर संस्थाच्या व्यवस्थापकीय विश्वस्ता मधील वाद असून प्रकरणांत अद्याप पर्यंत कोणता ही निर्णय झालेला नाही. तसेच सदर संस्थेच्या कब्रस्तानामधील हाजी आलमगीर शाह कादरी (सलामती पीर) यांच्या मजारावर जाण्यासाठी बंद केलेल्या रस्त्याचा वाद मोठया प्रमाणावर सुरु झालेला असुन भारतीय दंड संहिता १८६० कलम १४३, १४७, १४८, १४९, १५३-ए, ४४७, ४२७, ५०४, ५०६ (२) अन्वये संबंधित पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा नोंद झालेला आहे. प्रकरणांत दोन गटा मध्ये वाद विवाद भयंकर प्रमणात वाढलेला असुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झालेला आहे. सदरच्या ठिकाणी अनुचित प्रकरण घडू नये म्हणुन सदर संस्थेच्या अस्तित्वात असलेल्या विश्वस्तांना वेळोवेळी सुचना देवून ही त्यांच्याकडून त्याची

अमलबजावणी होत नाही म्हणुन सदरची संस्था वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ६५ अन्वये प्रत्यक्ष व्यवस्थापन मंडळा द्वारे अंगीकारणेसाठी तरतुद करण्यात आलेली आहे. निर्णयास्तव सादर.

ठराव क्र. २३

यावर सविस्तर चर्चा होवून चर्चेअंती सदर संस्था मुस्लीम जमात जुम्मा मस्जीद, कब्रस्तान देहु रोड, पुणे क्र. MSBD/PUN/७३/२००८ च्या व्यवस्थापकीय विश्वस्तांमधील मोठया प्रमाणावर अरोप प्रत्यारोप असुन सदर संस्थेच्या वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ४२ अन्वये सादर केलेल्या व्यवस्थापकीय विश्वस्तामधील फेरफार अर्जावर आक्षेप ही प्राप्त झालेले आहे तसेच सदर संस्थेच्या कब्रस्तानामधील दोन गटात भयंकर प्रमाणात वाद विवाद होवून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झालेला आहे म्हणुन सदर संस्था वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ६५ मधील तरतुदीनुसार वक्फ मंडळास प्राप्त असलेल्या अधिकाराचा वापर करुन सदर संस्थेचे व्यवस्थापन मंडळाद्वारे अंगीकरणेसाठी व सदर संस्था तात्काळ वक्फ मडळाच्या सरळ निगराणीखाली घेण्यात यावे. असे सर्वानुमते ठरले.

विषय क्र. २४

**वाकोला जुम्मा मस्जीद ट्रस्ट, पी.जे. नेहरु रोड, वाकोला सांताक्रुज (पूर्व) मुंबई च्या संबंधित असलेली वक्फ मालमत्ता विकसीत करुन भाडेतत्वावर देणे बाबत.**

सविनय सादर करण्यांत येते की, हाजी सलीम गणी गौंड व्यवस्थापकीय विश्वस्त, वाकोला जुम्मा मस्जीद ट्रस्ट, पी.जे. नेहरु रोड, वाकोला सांताक्रुज (पूर्व) मुंबई यांनी दि. २६/३/२०१८ रोजी अर्ज देऊन विनंती केली आहे की, सदर संस्था महाराष्ट्र विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० च्या तरतुदीनुसार बी-१९१ अन्वये नोंदणीकृत संस्था आहे. दि. १/१/१९९६ पासून वक्फ अधिनियम १९९५ संपुर्ण महाराष्ट्रात लागु करण्यांत आलेला असुन सदर संस्था कलम ४३ अन्वये मानीव नोंदणीकृत संस्था आहे. सदर संस्थेच्या संबंधित असलेली वक्फ मिळक्त सी.टी.एस क्र. १४३३ क्षेत्र ६६७.७ चौ.मि. पैकी ११४.९ चौ.मि. सदर संस्थेच्या विश्वस्तांनी मे. डॉल्फिन इन्फ्रास्ट्रक्चर, यांच्याशी विकसीत करण्याचा व भाडेतत्वावर देण्याचा करार केलेला आहे.

तरी सदर संस्थेच्या हिताच्या दृष्टीने सदरची मिळकत वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ५६ अन्वये दिर्घ मुदतीच्या भाडेतत्वावर देण्यास परवानगी देणे बाबत विनंती अर्ज दिलेला असून प्रादेशिक वक्फ अधिकारी कोकण विभाग मुंबई यांनी त्यांचे पत्र क्र. RWO/MUM/SNT-२६/२०१८ दि. २४/४/२०१८ अन्वये शिफारश करुन अहवाल सादर केलेला आहे. निर्णयास्तव सादर.

ठराव क्र. २४ **सदरचा विषयावर चर्चा न झाल्यामुळे पुढील बैठकीत ठेवण्यात येईल**

**ऐनवेळेचे विषय मा. कार्य-अध्यक्ष सो, यांचे परवानगीने**

विषय क्र. २५ **दर्गाह हजरत तराबुल हक्क साहेब परभणी टेंडर बोकुड कापणे (जुबाह) खांडखुंड निविदा बाबत.**

सभेस माहिती देण्यात आली की, दर्गाह हजरत तराबुल हक्क साहेब परभणी टेंडर बोकुड कापणे खांडखुंड संबंधी श्री. मोहसीन खान समंदर खान विरुध्द महाराष्ट्र शासन व ईतर याचिका क्रं. २१३६/२०१५ मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल करुन सदर कामा बाबत निविदा प्रसिध्द करणेसाठी मा. न्यायालयाला विनंती केली होती. दि. २८/४/२०१५ रोजी मा. न्यायालयानी प्रकरणात निकाल दिलेला असून बोकुड कापने (जुबाह) खांडखुंड संबंधी मा. वक्फ न्यायाधिकरण येथे दावा क्रं. ६५/२०१३ दाखल आहे तथापी या प्रकरणी न्यायाधिकरणानी कोणतेही स्थगिती आदेश दिलेले नाही. शिवाय मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपिठ औरंगाबाद यांनी याचीका क्रं. २१३६/२०१५ मध्ये आदेश दि. २८/४/२०१५ अन्वये निविदा प्रक्रिया त्वरीत सुरु करावी असे स्पष्टपणे आदेशित केले आहे. परंतू सदरहू मुल्ला लोक हे काम वंशपरंपरागत करित असल्या बाबत चे प्रकरण न्याय प्रविष्ट आहे. तसेच अवर सचिव महाराष्ट्र शासन अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय,

मुंबई ३२ यांचे पत्र क्रं. वक्फ २०१६/प्रक्र.१३३/का-४ दि. ८/५/२०१७ अन्वये ही निविदा काढण्यासाठी सुचना दिली आहे.

दि.१७ व १८ मे, २०१७ रोजी बैठकीत ठराव क्र. ४१/२०१७ अन्वये यावर सविस्तर चर्चा करण्यात आली की, दर्गाह तुराबुल हक्क साहब परभणी येथे बोकुड कापणे व खांडखुंड करण्यासाठी पुर्वी कधीही निविदा काढण्यात आलेले नसून हे वंशपरंपरागत मुल्ला करीत होते. त्यांचे उपजिविकेचे हेच साधन असुन त्यांच्या उदर्निर्वाह या कामावर निर्भर आहे. मागिल काही वर्षा पुर्वी निविदा काढण्याची पध्दत नव्याने सुरु करण्यात आलेली आहे ही बाब मा. उच्च न्यायलयाच्या नजरेत आणून देण्यात आलेली नाही. मु. का.अ. यांनी सांगितले की मंत्रालयाकडे लोक तक्रार करीत असल्यामुळे त्यांचे सारखे फोन येतात म्हणून त्यांच्याकडुन मार्गदर्शन मागितलेले आहे व याचिका क्रं. ३१३६/२०१५ मधील झालेल्या आदेशानुसार कार्यवाही व्हावी मा. न्यायालयानी बोर्डास आदेश दिलेले आहे. मा. सदस्य जनाब हबीब फकीह साहेब यांनी असे सांगितले की, मा. उच्च न्यायालयाच्या आदेशा विरुध्द या मध्ये फेर याचिका दाखल करुन वस्तुस्थिती न्यायालया समोर मांडावी व त्यासाठी वरिष्ठ विधी तज्ञाची नियुक्ती करावी असे ठरले होते.

**ठराव क्र. २५**

यावर सविस्तर चर्चा करण्यांत आली व चर्चेअंती मा. उच्च न्यायालय खंडपिठ औरंगाबाद यांच्याकडील याचिका क्र. २१३६/२०१५ मधील आदेश दि. २४/८/२०१५ तसेच अवर सचिव महाराष्ट्र शासन अल्पसंख्यांक विकास विभाग मंत्रालय, मुंबई-३२ यांचे पत्र क्र. वक्फ.२०१६/प्र.क्र.१३३/का-४ दि. ८/५/२०१७ अन्वये निवीदा काढण्या बाबत सुचना प्राप्त झाले असल्यामुळे शासनाच्या धोरनात्मक

निर्णयानुसार ई-टेंडरींग द्वारे सदर कामाचा निवीदा काढण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

विषय क्र. २६ **दि. ८ व ९ मे, २०१८ रोजी घेतलेल्या खालील प्रमाणे नमुद केलेल्या ठरावात दुरुस्ती करण्यांत आली.**

**ठराव क्र. २६** सभेसमोर दि. ८ व ९ मे, २०१८ रोजीच्या झालेल्या बैठकीचे इतिवृत्त मान्यतासाठी सभेसमोर ठेवण्यात आले असता खालील ठरावामधील दुरुस्ती व आदेश सन्माननीय सदस्यांच्या आजच्या बैठकीत देण्यात आलेले आहे.

**१) ठराव क्र. (५) :** नव नियुक्त होणा-या ॲडव्होकेट्सचे पॅनल वरील ॲडव्होकेट्सला देण्यात येत असलेल्या फि मध्ये खालील प्रमाणे बदल करण्यांत यावा असे सर्वानुमते ठरले.

**अ)** मा. उच्च न्यायालय, मुंबई सह खंडपिठ, नागपुर, औरंगाबाद प्रत्येकी प्रकरण रुपये १०,०००/-

**ब)** मा. महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण, औरंगाबाद प्रत्येकी प्रकरण रुपये ५,०००/-

**क)** जुन्या नियुक्त पॅनल वरील ॲडव्होकेट्स यांना पत्र देवून प्रत्येकी प्रकरणाची स्थीती मागवावी व त्यांच्याकडून नवीन पॅनल नियुक्त करण्यांत येत असल्यामुळे सर्व प्रकरणे परत मागवून घ्यावे.

**ड)** नवीन ॲडव्होकेट्सचे पॅनल नियुक्त करण्यांसाठी सरकारी वकीलांची यादी संबंधित विभागाकडून उपलब्ध करुन घ्यावी.

**२) ठराव क (२७) :** देवडी बाजार, औरंगाबाद हाऊस जमात खाना दारुल इमारत सि.टी.एस नं. ३९७९ क्षेत्र ८३३.७ चौ.मि. च्या बेकायदेशिर विक्री परवानगी बाबत नव्याने चौकशी करण्याचे आदेश सचिव, अल्पसंख्यांक

विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दिले आहे यावर सविस्तर चर्चा होवून सदरच्या प्रकरणांत महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी फेरचौकशी करावी असे सर्वानुमते ठरले.

**३) ठराव क्र. (३१)** : नॅशनल वक्फ डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन न्यू दिल्ली, यांच्याकडून महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या बळकटीकरण करण्यासाठी त्यांचे मार्गदर्शीकानुसार भरावयाच्या पदासाठी नव्याने अर्ज तात्काळ जाहीरात देवून मागविण्यात यावे व त्यांची मुलाखती दि. १४ व १५ जुलै २०१८ रोजी इस्लाम जिमखाना मरीन लाईन, मुंबई येथे ठेवण्यांत यावी असे सर्वानुमते ठरले

**४) ठराव क्र. (४१)**: महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण यांच्याकडील अर्ज क्र. ०३/२०१६ मधील आदेश दि. १५/४/२०१७ अन्वये मस्जीद मौजे कर्जत ता. कर्जत जि. रायगड यांच्या व्यवस्थापकीय विश्वस्तासाठी दोन्ही पक्षकारात सुनावणी घेण्याची आवश्यकता नाही म्हणुन सदर संस्थेची निवडणुक घेण्यासाठी तात्काळ निवडणुक अधिकारीची नियुक्ती करुन निवडणुक घेण्यात यावी अशी दुंरुस्ती करण्यांत आली.

५) दि. १२/७/२०१७ रोजी च्या बैठकीत ठराव क्र. (३२) मधील परिच्छेद क्र.४ मध्ये ठरल्याप्रमाणे दर्गाह हजरत पीर सद्रोद्दिन ट्रस्ट, इगतपुरी जि. नाशिक च्या प्रकरणांत दि. ८ व ९ मे, २०१८ च्या बैठकीत जनाब रिजवान मर्चंट साहेब ॲडव्होकेट, मुंबई (फौजदारी वकील) यांची नियुक्ती करणे बाबत निर्णय घेण्यात आला होता परंतु मा. जनाब जहीर अब्बास रिजवी यांचे सुचनेनुसार सदरच्या प्रकरणांत श्री. सरफराज जैदी ॲडव्होकेट, (फौजदारी वकील) यांची नियुक्ती करण्यांत यावी असे सर्वानुमते ठरले.

विषय क्र. २७ **अंबरनाथ मस्जिद ट्रस्ट मुस्लिम जमात अंबरनाथ जि. ठाणे MSBW/THN/९१/२००९ च्या निवडणूकी बाबत.**

ठराव क्र. २७

सभेत माहिती देण्यांत आली की, अंबरनाथ मस्जिद ट्रस्ट, मुस्लिम जमात अंबरनाथ, जि. ठाणे MSBW/THN/९१/२००९ च्या विश्वस्तांच्या निवडणुकी बाबत मा. महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण औरंगाबाद यांच्या कडील आदेश दि. १०.०६.२०१३ अन्वये वक्फ मंडळानी निवडणूकीचे आदेश दिले आहे. आदेशा प्रमाणे वक्फ मंडळा कडून निवडणुक प्रक्रिया पुर्ण करण्यांत आली असून निवडून आलेल्या विश्वस्तांनी कलम ४२ अन्वये फेरफार अर्ज हि सादर केलेला आहे. जनाब महेमूद मिरा सय्यद व इतर जुने विश्वस्त यांनी दि. १९.०६.२०१८ रोजी सभे समोर अर्ज देवुन विनंती केली आहे की, मा. न्यायालयाने रद्द केलेल्या स्कीम प्रमाणे दि. ८/१०/२०१७ रोजी पुर्व नियोजीत निवडणुक प्रक्रिया एकतर्फी घेण्यात आलेली असून प्रभारी प्रादेशिक वक्फ अधिकारी, कोकण विभाग मुंबई यांनी त्याच दिवशी कुलूप तोडून श्री. सलीम चौधरी जिंदावली व इतर यांना ताबा दिलेला आहे. अम्ही ट्रस्टी असतांना अधिकृत मान्यता प्राप्त स्किम प्रमाणे निवडणूक घेवून निवडून आलेल्या विश्वस्तांचा कलम ४२ अन्वये फेरफार अर्ज ही सादर केलेला आहे तरी ही वक्फ मंडळाने आमच्या फेरफार अर्जावर निर्णय न घेता पुन्हा निवडणूक घेतलेली आहे म्हणुन सदर संस्थेची फेर निवडणूक घ्यावी अशी विनंती अर्ज दिला आहे.

या बाबत सभेचे अध्यक्ष व सदस्यांनी सूचना केली आहे की, वक्फ मंडळानी व जुन्या विश्वस्तांनी घेतलेली निवडणूक दि. २९/६/२०१३ ची मुतवल्ली व दि. ६/७/२०१३ विश्वस्तांची निवडणुक घेतल्या प्रमाणे जनाब लालभाई शेख व इतर यांनी दि. २६/७/२०१३ रोजी दाखल केलेल्या कलम ४२ अन्वये फेरफार अर्ज व दि. ८/१०/२०१७ रोजी निवडणुक घेवून श्री. सलीम चौधरी व इतर यांनी दि. २३/१०/२०१७ रोजी दाखल केलेले कलम ४२ अन्वये फेरफार अर्ज दोन्ही फेरफार अर्ज व घेतलेल्या निवडणुक रद्द

करण्यांत येत आहे. तसेच सदर संस्थेच्या व्यवस्थापना मधील दोन गटात मोठया प्रमाणे वाद असून प्रकरण न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहे. म्हणुन सदर संस्थेचा ताबा वक्फ मंडळानी तात्काळ घ्यावा. व मा. महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण, औरंगाबाद यांच्याकडील प्रकरणांत दि.१३/८/२०१४ रोजी दिलेल्या निर्णयानुसार अधिकृत योजने प्रमाणे प्रादेशिक वक्फ अधिकारी यांच्या देखरेख खाली प्रचलित निवडणुक कार्यक्रम घोषीत करुन निवडणुक घ्यावी असे निर्देशीत करण्यांत आले.

**दि. ८ व ९ मे २०१८ रोजी च्या ठराव क्रं. ३७ मध्ये खालील प्रमाणे दरुस्ती करण्यात येत आहे.**

यावर सविस्तर चर्चा होवून चर्चेअंती वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ६९ अन्वये प्राप्त प्रस्तावास मान्यता देण्यासाठी कलम २७ अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी व कोणतेही दोन सदस्याची संपर्क करुन त्यांना बरोबर घेऊन मान्यता देण्याचे अधिकार प्रदान करण्यात येत आहे. असे सर्वानुमते ठरले.

**(मा. खा. जनाब हुसैन दलवाई साहेब)**
सभेचे अध्यक्ष,

**मा. जनाब मौलाना जहीर अब्बास रिजवी साहेब-**
सदस्य

**मा. जनाब मौलाना गुलाम वस्तानवी साहेब,**
सदस्य

मा. जनाब आसिफ शौकत कुरेशी साहेब,
सदस्य

**मा. जनाब खालीद बाबु कुरेशी साहेब,**
**सदस्य**

मा. जनाब इम्तियाज मुश्ताक काजी साहेब,
सदस्य

**मा. जनाब एस. सी. तडवी**
**सदस्य सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,**